ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
Janury-June 2024- Vol. 13 No. 1

# सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत उच्चशिक्षित महिलांचे योगदान

**प्रा. खेत्री हनुमान रामभाऊ**

*वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड*

*मो.क्र. – 9545530524*

***Abstract –***

*कधी काळी उपेक्षित, वंचीत आणि सर्वच क्षेत्रामध्ये दुय्यमत्व आसलेली स्त्री आजच्या या आधुनिक युगात सर्व बंधणे तोडत ती आज प्रत्येक क्षेत्रात आपल स्थान निश्चित करत आहे. प्रत्येक क्षेत्रात आज स्त्री भरीव कामगिरी करत आहेत. आधुनिक शिक्षणामुळे उच्चशिक्षित स्त्री आज हक्क आणि अधिकार प्रत्येक क्षेत्रात गाजवत आहे. प्रत्येक क्षेत्रात ती भरीव कामगीरी करीत आहे आणि पुरुषाच्या बरोबर प्रत्येक क्षेत्रात निर्णय गाजवत आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील प्रत्येक व्यवस्थेत भारतीय स्त्रीचे योगदान आज नाकारता येणार नाही म्हणुन हा शोध निबंध महत्वाचा आहे.*

***Key words***

*Development, education, contribution, women empowerment*

**Introduction -**

परिवर्तन हा समाजाचा अविभाज्य घटक आहे. गूड आणि हंट मते सामाजिक बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. तसेच जॉन्सनमते मुलभूत आर्थाने समाजरचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. भारतीय समाज व्यवस्था ही पुरुष प्रधान आसल्यामुळे येथील सर्व हक्क आणि अधिकार सहाजिकच पुरुषाकडे आले आणि स्त्रिकडे दास्यत्व आले. कोणत्याही समाजाची प्रगती हि स्त्री आणि पुरुष समानता आसेल तरच त्या समाजाची प्रगती होत आसते. समाजिक परिर्वतनाच्या प्रक्रियेत स्त्रीयामध्ये देखील असंख्य स्वरुपाचे बदल त्याच्या दर्जामध्ये आणि अधिकारामध्ये घडुन आले आणि या प्रक्रियेमध्ये स्त्रीया पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून कार्य करु लागल्या म्हणुन या शोध निबंधाला महत्व आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे ( Research Objective ) –**

1. परिवर्तनाच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.
2. परिवर्तनाच्या प्रक्रियेत उच्चशिक्षीत महिलांचे योगदान अभ्यासणे.
3. स्त्रीशिक्षणामुळे घडुन आलेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये ( Research Hypothesis ) –**

1. सामाजिक परिवर्तन हा समाजाचा अविभाज्य घटक आहे.
2. उच्च शिक्षणामुळे स्त्रीने आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबर आपले योगदान सिध्द केले आहे.
3. परिवर्तनाच्या प्रक्रियेत उच्चशिक्षणामुळे स्त्रीला आज प्रत्येक व्यवस्थेमध्ये समानतेची व आधिकाराची बाजू मांडता येत आहे.

**संशोधन पध्दती ( Research Methodology ) –**

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत प्रत्येक घटकामध्ये बदल होऊन नविन समाज व्यवस्था निर्माण होत असते. यामध्ये नविन कायदा, नविन सुधारणा, नविन चळवळी, नवे मुल्ये, प्रत्येकांना शिक्षण याचाच परिणाम महिलांनी उच्च शिक्षण प्राप्त केले. उच्च शिक्षणामुळे महिलांना जाणीव होऊन त्यांचे दुय्यमत्व व त्याचे दास्यत्व हे पुरुषप्रधान व्यवस्थेची लादलेली एक निती होती हे त्याच्या लक्षात आले. उच्च शिक्षणामुळे त्यांना “स्व” ची जानीव झाली. अधिकार आणि सत्ता याचे महत्व कळले यातूनच उच्चशिक्षीत महिलांने नवविचार, नवमुल्ये याचा स्विकार करुन त्या सत्ता आणि अधिकार प्राप्त करु लागल्या.

समाजामधील प्रत्येक क्षेत्रात मग ते सामाजिक, आर्थीक, राजनैतीक, सांस्कृतीक, शैक्षणिक आशा प्रत्येक क्षेत्रात त्या भरीव कामगीरी करु लागल्या. आजच्या आय.टी. च्या युगात तर स्त्री स्पेस मध्ये तसेच अंतराळामध्ये देखील संशोधन करुन प्रत्येक क्षेत्रात मान – सन्मान प्राप्त करुन एक भरीव कामगीरी त्या करत आहेत. आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबर खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात मोलाची कामगीरी करत आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत आज स्त्रीयाचे योगदान नाकारत येणार नाही. स्त्री शिवाय प्रगती नाही स्त्री शिवाय विकास नाही हे आज च्या स्त्रीने दाखवून दिले आहे. सामाजिक व्यवस्था आसेल किंवा राजकिय व्यवस्था असेल प्रत्येक व्यवस्थेमध्ये आजच्या स्त्रीचे योगदान नाकारता येत नाही. आधुनिक युगातील स्त्रीयाची ही

कामगीरी राष्ट्राला एक्या प्रगतीच्या दिशेकडे नेताना दिसुन येते म्हणुन या शोधनिबंधामध्ये सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत उच्च शिक्षीत महिलांचे योगदान हे राष्ट्रनिर्मीती आणि राष्ट्रविकासामध्ये मोलाचे आसल्याचे दिसुन येते.

**निष्कर्ष ( Conculusion )-**

1. उच्च शिक्षणामुळे कुटूंब व्यवस्थेमध्ये स्त्रीयांना समान अधिकार प्राप्त झाले आहे.
2. निर्णय प्रक्रियेमध्ये आज स्त्री पुरुषांच्या पुढे आहे.
3. सत्ता आणि अधिकार स्त्रीला प्राप्त झाले आहे.
4. उच्च शिक्षणामुळे स्त्री स्वताः निर्णय घेऊ शकते.
5. आजची स्त्री पुरुषाच्या खांयाला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात कार्य करत आहे.
6. आजच्या आधुनिक स्त्रीचे राष्ट्राच्या निर्मीतीमध्ये मोलाचे योगदान आहे.
7. सामाजिक परिवर्तनामुळे आजची महिला प्रत्येक क्षेत्रात भरीव कामगिरी करुन प्रत्येक क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची (Reference)** –

- पुजारी कृष्णकुमार, सामाजिक परिवर्तन, राधेय प्रकाशन नागपुर 1977 पृ.क्र. 113
- बारबिंड भगवान, सामाजिक संस्था, शारदा प्रकाशन नांदेड – 1964 पृ.क्र. 79
- दिवेकर हरिशचंद्र – स्त्री शिक्षण – हिंगणे प्रकाशन नागपुर 1965 पृ. क्र. 13
- जाधव सुशिला – डॉ. आंबेडकर आणि भारतीय स्त्री कौशल्य प्रकाशन 2006 पृ.क्र.38
- शुभागी गव्हाणे – महिला सबलीकरण वरद प्रकाशन 2004 पृ. क्र. 28